# “१९७५ नंतरच्या निवडक स्त्री-लेखिकांची प्रवासवर्णने: एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या
मानव्य विद्याशाखे अंतर्गत, मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी अंशतः सादर केलेला संशोधन आराखडा


संशोधक

हुंबे अमोल महादेव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पोतुलवार बालाजी लक्ष्मणराव

पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड


मार्च - २०२३

**प्रस्तावना :**

मानवी विचार, भावना, अनुभूती व कल्पना शब्दांकित करणे म्हणजे साहित्य होय. भाषिक रचनेमुळे साहित्याचे गद्य आणि पद्य या प्रकारात वर्गीकरण केले जाते, गद्य मानवी जीवनाच्या अनेक अंगांशी, दैनंदिन व्यवहारांशी स्वाभाविक रित्या अधिक निगडीत असते. गद्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य यांचा समावेश होतो. ललितगद्य वाङ्‌मय प्रकारामध्ये व्यक्तिचित्रे, भावचित्रे, शब्दचित्रे,निसर्गचित्रे, विनोदी लेखन, प्रवासवर्णन या-सारख्या उपप्रकारांचा समावेश होतो. यातील प्रवासवर्णन वाङ्‌मयप्रकार महत्त्वाचा असून तो इतर वाङ्‌मय प्रकारांपेक्षा सर्वार्थाने भिन्न आहे.

प्रवास ही मानवी जीवनाची मूलभूत प्रेरणा आहे. प्राचीन काळापासूनच माणूस प्रवास करत आला आहे. या प्रवासापाठीमागचा हेतू हा आध्यात्मिक, धार्मिक व व्यावहारिक स्वरूपाचा असल्याचे दिसून येते. अलिकडील काळात यात अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. शिक्षण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण, औद्योगिकीकरण या संकल्पनांमुळे उद्योग, व्यापार, पर्यटन, मनोरंजन, नोकरी या कारणांमुळेच माणूस एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात, एका देशातून दुसऱ्या देशात प्रवास करू लागला या प्रवासात त्याने आपला भौगोलिक प्रदेश, निसर्ग, संस्कृती, कला, प्रथा, परंपरा, मानवी भाव-भावना, प्रेम, आस्था, राष्ट्राभिमान, लोकजीवन यांची तुलना त्या-त्या भूप्रदेशाशी केली. याच अनुभवांना माझ्या नजरेतून 'मी' शब्दांकित केले पाहिजे याच प्रेरणेतून व त्यांच्या लालित्यपूर्ण, अनुभवसिद्ध व वास्तव लेखनातूनच प्रवासवर्णन हा वाङ्‌मय प्रकार अवतरला.

मराठी मातीत जन्मलेल्या अनेक दिग्गजांनी हा वाङ्‌मयप्रकार हाताळला पु.ल.देशपंडे गंगाधर गाडगीळ, अनंत काणेकर ही त्यातली पुरूष मंडळी तर गिरीजा कीर, मीना प्रभू, इंदुमती शेवडे या सारख्या अनेक स्त्री लेखिकांचाही त्यात समावेश होतो.

मानवी मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तीतून अवतरलेल्या या वाङ्‌मय प्रकारात पाहिलेल्या भूप्रदेशाचे तेथील निसर्गाचे, लोकजीवनाचे, प्रथा-परंपरांचे, कला व जीवनमूल्यांचे, वस्तू-वास्तूंचे यथा-तथ्य वर्णन येते. उत्तम साहित्यिक आपल्या प्रतिभासंपन्न लेखनीच्या बळावर, कलात्मकतेची जोड देऊन या साहित्यकृतीला अजरामर करतो. यात वास्तवदर्शी चित्रण आल्यामुळे व भाव-भावनांची अभिव्यक्ती असल्यामुळे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे

पडसादही त्यात उमटतात.

एवढा समृद्ध वाङ्मयप्रकार असूनही इतर वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत हा दुर्लक्षितच राहिलेला दिसून येतो. काही प्रमाणात या वाङ्मय प्रकाराबाबत समीक्षात्मक लेखन झाले असले वा थोड्या फार प्रमाणात शोधनिबंध प्रकाशित झाले असले तरीही, यातील स्त्रियांच्या लेखनावर तितकासा प्रकाश टाकलेला दिसत नाही. म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला.

## संशोधन विषय निवडीची प्रेरणा :

अगदी सुरूवातीपासूनच मला प्रवासाची फार आवड आहे. ज्या-ज्या वेळी एखाद्या भू-प्रदेशाला मी भेट द्यायचे ठरवतो त्या-त्यावेळी या अगोदर त्या प्रदेशाला भेट दिलेल्या व्यक्तींचे अनुभव मी जाणून घेत असे. हळूहळू ते अनुभव जाणून घेण्यासाठी प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे मी वाचन करू लागलो. अशा साहित्याचे व त्यावरील समीक्षा ग्रंथांचे वाचन करत असताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही की आपल्या मराठी साहित्यात जी प्रवासवर्णने वाचायला मिळतात त्यात पुरूष लेखकांच्या लेखनाचाच समावेश अधिक आहे.

प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकारातील स्त्री लेखिकांची प्रवासवर्णने माझ्या वाचनात आली तेव्हा त्यांच्या नजरेतील त्यांनी अनुभवलेला निसर्ग, त्याच्या प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, प्रथा, परंपरा यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन पुरूष लेखक मंडळीपेक्षा भिन्न असल्याचे जाणवले. ती स्त्री मनाची भावतरलता, वेगळेपण, मांडणीतली कल्पात्मकता स्पष्ट झाली पाहिजे असा विचार माझ्या मनात आला व या दृष्टीने माझे प्रयत्न सुरू झाले. जेव्हा मी या विषयावर संशोधन करायचे ठरवले तेव्हा माझे मार्गदर्शक प्र.डॉ.बालाजी पोतुलवार सरांसमोर मी हा विषय मांडला. त्यावरील साधक-बाधक चर्चेअंती सरांनी मला हा विषय निवडण्यासाठी प्रोत्साहन दिले व सरते शेवटी "१९७५ नंतरच्या स्त्री-लेखिकांची प्रवासवर्णनेः एक चिकित्सक अभ्यास" या विषयाची संशोधन कार्यासाठी निवड केली.

## संशोधनाचे महत्त्व :

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. त्या त्या साहित्यामध्ये आलेले वर्णन हे समाजाभिमूख असते. त्यात लोक-जीवन, खान-पान, पोषाख, रूढी-प्रथा, परंपरा दृग्गोचर होतात. प्रस्तुत संशोधनामधूनही प्रवासवर्णन करणाऱ्या लेखिकांच्या लेखनीतून अवतरलेले लोकजीवन, निसर्ग, भूप्रदेशांचे वर्णन जाणून घेण्यास मदत होईल. स्त्री-लेखिकांची वाङ्मयीन व कलात्मक दृष्टी अभ्यासण्याच्या दृष्टीनेही हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते प्रवासवर्णनातून आलेले सामाजिक व सांस्कृतिक जीवन जाणून घेता येईल. मनोरंजनाच्या दृष्टीने ही प्रवासवर्णने कितपत उपयुक्त ठरतात याविषयीही स्पष्ट येईल.

कोणत्याही गोष्टीकडे पाहताना स्त्री आणि पुरूषांच्या निरिक्षणक्षमतेत भिन्नता असलेली आपल्या सहज लक्षात येते. जेव्हा एखादी वस्तू पुरूष पाहतो त्यावेळी त्याच्या नजरेत त्या वस्तूचे बाह्यात्कारी सौदर्य भरते, मात्र एखादी स्त्री त्याच्या अंतरंगात डोकावते तिच्या नजरेतून त्या वस्तूचे कलात्मक पदर तर उलगडतातच; पण त्याबरोबरच भावनात्मक गुंताही उलगडत जातो म्हणूनच या दृष्टीने देखील हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते ज्यामुळे प्रवासवर्णनातील स्त्री-सुलभ भावनिक पदर उलगडतील.

## अंतर्विद्याशाखीय अध्ययन :

साहित्य केवळ कल्पनांच्या भराऱ्यांनी निर्माण होत नाही ते काळ आणि समाजाशी निगडीत असते. यामुळे प्रस्तुत संशोधन अंतर्विद्याशाखीय अध्ययनात येते कारण प्रवासवर्णनातील संशोधनाची उद्‌दिष्टे लक्षात घेता ऐतिहासिक, सामाजिक, भौगोलिक, मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून समजून घ्यावे लागेल.

## संशोधनाची उद्दिष्टे :

१) प्रवासा पाठीमागील हेतूंचा अभ्यास करणे.

२) निसर्ग वर्णन व भौगोलिक प्रदेश वर्णनाचा अभ्यास करणे.

३) प्रवासवर्णनातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन अभ्यासणे.

४) प्रवासवर्णनातील विनोदी लेखनशैली अभ्यासणे.

५) प्रवासवर्णनातील स्त्री-जीवनाकडे पाहण्याचा स्त्री-लेखिकांचा दृष्टीकोन अभ्यासणे.

६) प्रवासवर्णनातील वाङ्मयीन दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

**पूर्व संशोधनाचा आढावा :**

१) “अर्वाचीन मराठीतील प्रवासवर्णने”
संशोधक : प्रा.वसंत ला.सावंत
मार्गदर्शक : डॉ.प्रा. तोडमल एच. के.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२) “१९६० नंतरच्या निवडक प्रवासवर्णनांचा अभ्यास”
संशोधक : गुंजेकर व्ही.एस.
मार्गदर्शक : डॉ. दुकळे प्रकाश
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३) “प्रवासवर्णनांचा पर्यावररणीय संवेदनात्मक अभ्यास”
१९९० ते २०१० निवडक प्रवासवर्णने
संशोधक : प्रा. कल्पना गावडे
मार्गदर्शक : डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेटकर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

४) “गिरीजा कीर : एक विवेचक अभ्यास”
अभ्यासक : एकनाथ बाबुराव आळेकर
मार्गदर्शक : प्रा.डॉ. पंडित भीमराव टापरे
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने १९७५ ते २०२० दरम्यान मराठी स्त्री-लेखिकांच्या प्रवासवर्णनांच अभ्यास करणार आहे. त्यातील निवडक स्त्री-लेखिकांची प्रवासवर्णने अभ्यासासाठी घेतली जातील.

## संशोधन पद्धती :

संशोधन कार्यामध्ये संशोधन पद्धतीला अतिशय महत्त्व असते एकूणच या संशोधन कार्याची व्याप्ती पाहता संशोधकाने ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विवेचनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्याचे ठरविले आहे.

## संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधन परिपूर्ण होण्यासाठी लिखित सांधनांचा उपयोग केला जाणार आहे. त्यात संबंधित लेखिकांची प्रवासवर्णने, शोधनिबंध, समीक्षात्मक ग्रंथ, नियतकालिके, शब्दकोश इत्यादींचा आधार घेतला जाणार आहे.

## संशोधनाचे अध्ययन विभाजन :

प्रस्तुत संशोधन एकूण सात प्रकरणांत विभागले जाईल.

प्रकरण १ : प्रवासवर्णन वाङ्मयप्रकार संकल्पना, स्वरूप व वाटचाल

प्रकरण २ : १९७५ ते १९९० या कालखंडातील स्त्री-लेखिकांची प्रवासवर्णने

प्रकरण ३ : १९९१ ते २०२० कालखंडातील स्त्री-लेखिकांची प्रवासवर्णने

प्रकरण ४ : प्रवासवर्णनातील निसर्ग, भौगोलिक प्रदेश व सामाजिक सांस्कृतिक जीवन

प्रकरण ५ : प्रवासवर्णनातील विनोदी लेखन शैली

प्रकरण ६ : प्रवासवर्णनांचे वाङ्मयीन मूल्यमापन

प्रकरण ७ : उपसंहार, निष्कर्ष

## संदर्भग्रथ सूची :

१) जाधव रा.ग., साहित्य व सामाजिक संदर्भ (१९९५ ते ०९९६)

२) कुलकर्णी गो.म., आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (१९९४) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

३) कुलकर्णी वा.ल., प्रवास चित्रणात्मक लेखन, काही विचार (१९६३)

४) जाधव रा.ग., पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य
५) सावंत वसंत, प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, म.रा.सा.व संस्कृती मंडळ, मुंबई
६) संशोधन मार्गदर्शक मालिका (पृष्ठ १ ते १४) य.च.मु. विद्यापीठ, नाशिक
७) डॉ. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे
(श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर)

**संशोधक**
हुंबे अमोल महादेव

**मार्गदर्शक**
प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार